# प्रकरण तिसरे

## ग्रामपंचायती स्वरूप व रचना

## प्रकरण तिसरे

## ग्रामपंचायती स्वरूप व रचना

ग्रामपंचायती म्हणजे स्थानिक स्वराज्याला पायाभूत असतात. या पंचायती त्या ठिकाणाच्या जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून गावचा कारभार चालवतात.

लोकशाही राज्य पध्दतीची प्राथमिक शाळा स्थानिक स्वराज्य संस्था हा कारभार लोकमताने चालवलेला असतो. आणि प्रतिनिधी हेच लोकांच्या हक्कांचे रखवालदार असतात. ग्रामपंचायती, नगर पालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, राज्यसभा, लोकसभा अशा विविध सभामध्ये निवडून आलेले प्रतिनिधी आपआपली कामे करतात आणि राष्ट्र-सेवा करून राष्ट्रोन्नतीत भर घालतात.

गावचा कारभारही लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीकडून चाल-विला जातो. तथापि प्रतिनिधी निवडून दिला म्हणजे कारभाराशी जनतेचा संबंध सुटला असे होऊ नये. यासाठी ग्राम सेवेची योजना आखली आहे. गावातील प्रौढ व्यक्ती ग्रामसेवेचे घटक असतात. कमीत कमी दोन बैठका वर्षातून घ्यावयाच्या असतात आणि त्या कामकाजाचा विचार विनिमय करतात.

सामान्य जनतेला कारभाराबद्दल आपुलकी वाटली पाहिजे. आणि त्यांनी ग्रामसेवेत अस्थीने व स्वीयबुध्दीने भाग घ्यावयाचा असतो. पंचायतीची स्थापना झाली म्हणजे सभासदांची संख्या निश्चित होईल. स्त्रीयांना

देखील राखीव जागा देऊन प्रतिनिधीत्व दिलेले आहे व सभासदांना निवडणारे मतदार कोण व किती प्रत्यक्ष निवडणूक कशी घ्यावयांची आणि त्या राखीव व इतर सभासद किती असावयाचे आणि सरपंच व उपसरपंच यांची निवडणूक कशी करावयाचे हे प्रश्न ओघाने हळूहळू ठरविले जातील.

विभागात ग्रामपंचायती स्थापन झाल्या पाहिजेत. त्यांच्यात राखीव जागा किती असाव्यात, निवडणूक कशी करावी इत्यादी प्रश्न विचारात घ्यावयाचे असतात. सरपंच किंवा उपसरपंच विश्वास ठराव मंजूर झाला तर त्याचा परिणाम कोणत्या रेही ठरवावे लागेल.

एखादे महसूली गाव किंवा गावाचा गट किंवा गावाचा भाग आसणाऱ्या वाडया त्यांचे क्षेत्र किंवा इतर प्रशासनीक घटक किंवा त्यांचा भाग या नावाने ओळखण्यात येतो. त्याला गांव असे म्हणतात.

गांवाचा गट आणि वाडया आणि प्रशासनीक घटक किंवा त्याचा भाग गाव म्हणून जाहीर केला जातो आणि ते गाव त्या त्या नावाने ओळखले जातात.

राज्य सरकार स्थायी समितीशी आणि पंचायतीशी विचार विनिमय करुन कोणत्याही वेळी आदी सूचना देईल. तेव्हा कोणतेही क्षेत्र कोणत्याही गावात समाविष्ट करता येईल. एका गावातून वगळून जाईल आणि गावाच्या सीमेमध्ये फरककेला जाईल. किंवा एखादे क्षेत्र गांव म्हणून बंद केले जाईल तेव्हा या गोष्टीबद्दल दक्षतेने सरकारी परिपत्रक वाचण्यात यावे.

ग्रामपंचायतीचे क्षेत्र आणि मर्यादा महसूल गावाऐवढेच क्षेत्र असेल किंवा एकापेक्षा अधिक गावाचा गट असेल किंवा एका गावात अनेकवाडया असतील किंवा कारभाराच्या सोयीसाठी घटक ठरविलेले असतील किंवा त्यांचे भाग ठरविलेले असतील. १५ ऑगस्ट, १९३७ पासून नविन जमीन महसूल कायदा केला असून त्याच्या आदिनियमाने ३०० वस्तीच्या वाडयाला गावाचा दर्जा प्राप्त होईल आणि प्रत्येक महसूली गावात एक ग्रामपंचायत असेल. हे चौकशी करुन ठरविले जाईल. गावात पंचायत स्थापन झाली किंवा पंचायत कायद्यापूर्वी प्रमाणे पंचायत झाली असेल त्या गावांचे क्षेत्र बदलता येईल किंवा बंद करता येईल. यावेळी पंचायत जिल्हा परिषद व पंचायत समितीशी विचार विनिमय करावा लागेल. तथापि त्यांचे मत शासन मंजूर करेल असे नाही.

तथापि गावांत एक ग्रामपंचायत असेल. ब्रिटिश काळात सत्तेच्या केंद्रीकरणावर भर होता. स्वातंत्र्योत्तर विकेंद्रीकरणाला फार महत्व प्राप्त झाले. कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात अभिसूचना प्रसिध्द केल्यावर ज्यांचे नाव मतदारांच्या यादीत समाविष्ट केले असेल अशा व्यक्तींची मिळून ग्रामसभा असेल.

प्रत्येक वित्तीय वर्षात अमूक तारखेस अमूक वेळी ठिकाणी ग्रामसेवा भरेल असे ठरविले जाईल. अशा कमीत कमी दोन सभा भरविल्या जातील. योग्य कारण नसताना सरपंच, उपसरपंच अशा दोन सभापैकी कोणतीही एक सभा भरविण्यास चुकला तर त्या पदावर राहण्यास किंवा उरलेल्या पदावलीसाठी निवडण्यास अपात्र ठरेल. कारण होते किंवा नाही हे जिल्हाअधिकारी ठरवतील. सरपंचास स्वत:हून केव्हाही ग्रामसेवा बोलावता

येईल. स्थायी समिती, पंचायत समिती किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून मागणी केली तर निर्दिष्ठ केलेल्या मुदतीत सरपंचाने ग्रामसभा बोलावली पाहिजे. आणि तसे केले नाही तर मुख्य कार्यकारी अधिकारी गटविकास अधिका-याला सभा बोलावण्यास सांगेल. तसे सांगितल्यापासून १५ दिवसात अशी सभा बोलावली पाहिजे. कार्यकारी मुख्य अधिकारी किंवा गट विकास अधिकारी यांनी अधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याने असे काम केले पाहिजे. ग्रामसभेचे काम चालू असता प्राधीकृत केलेल्या कोणत्याही अधिकाना भाषण करता येईल किंवा सभेत भाग घेता येईल. पण मत देता येणार नाही.

ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच किंवा त्याच्या गैरहजरीत उपसरपंच सभेचा अध्यक्ष असेल. दोघांच्या गैरहजरीत हे काम चालविण्यासाठी उपस्थिती असलेल्या पंचायतीच्या सदस्यामधून एकाची निवड केली जाईल. ग्रामसभेत हजर राहणे यात वाद निर्माण झाला तर अध्यक्षांनी सबंध गावांच्या किंवा प्रधाताचा मतदार यादीतील लोंदी लक्षात घेऊन या वादाचा निर्णय लावावा. ह्यांचा निर्णय अखेरचा असेल. सरपंच किंवा त्यांच्या गैरहजरीत उपसरपंच यांनी ग्रामसभा घेतली पाहिजे. परंतु त्यांनी ती न घेतल्यास ते आपल्या पदावर राहण्यास अपात्र ठरतील. सर्वोच्च न्यायालयातही या-बद्दल असाच निर्णय आहे.

पंचायतीने लेखावरण पत्र ग्रामसभेपुढे ठेवले पाहिजे. ग्रामसभेची पहिली सभा वित्तिय वर्ष सुरु झालेपासून २ महिन्यात भरविली पाहिजे. या सभेपुढे वार्षिक हिशोबाचे पत्र मागील हिशोबाचे टिपण किंवा त्याला

दिलेली उत्तरे, स्थायी समिती, पंचायत समिती, मुख्य कार्यकारी हे विषय कोणत्याही सभेपुढे ठेवले जातील.

ग्रामसभा या विषयांवर चर्चा करील व सूचना देईल. त्यांचा विचार ग्रामपंचायतीने केला पाहिजे. राज्य सरकार आपल्या आदेशाने असे सांगू शकेल, जी कामे सांगितली ती कामे ग्रामपंचायतीने पार पाडली पाहिजेत. सभासदांनी या सभेत आस्थेने भाग घेतला पाहिजे. जनतेच्या सार्वभौमत्वाचे तत्व ग्रामपंचायतीपासून सुरु होते. मतदार हाच खरा अंतिम सार्वभौम आहे. मतदार सार्वभौमत्वाचे तत्व ग्रामपंचायतीपासून सुरु होते. मतदार हाच खरा अंतिम सार्वभौम आहे. मतदार ~~हाच खरा अंतिम~~ वित्तीय वर्ष एप्रिल पासून सुरु होते व पुढील वर्षाच्या ३१ मार्च अखेरपर्यंत जागृत असला पाहिजे. ग्रामसभा आपल्यापुढे आलेल्या विषयावर विचार करते.

मतदार आणि पंचायत सदस्य यांचे संबंध नजीकचे असले पाहिजेत. मतदार उदासिन नसावेत आणि पंचायत सदस्य स्वार्थ प्रवण नसावेत. गावांचे हित व गावाची प्रगती याकडे पंचायतीने लक्ष द्यावे व मतदारानी पंचायत कारभार व्यवस्थित व प्रामाणिकपणे इतर काळजीपूर्वक पाहावे.

सभेसाठी आवश्यक ती गणपूर्ती असली पाहिजे. एकूण मतदारांच्या यादीतील १५ % किंवा १०० इसम यापैकी जी कमी असेल ती संख्या गणपूर्ती अभावीतहकूब होते.अशी तहकूब झालेली सभा असून पुढील सभेत मात्र गणपूर्ति पाहिली जाणार आहे.

ग्रामपंचायत म्हणजे एक निगमनिक असतो. तिचे अस्तित्व व्यक्ती निरपेक्ष असते. सर्व पंचायतीसह सभासद पदच्युत झाले किंवा कोणत्या न कोणत्या कारणाने त्यांचे सभासदत्व जाऊन त्यांच्या जागा रिकाम्या राहिल्या तरी देखील पंचायतीचे अस्तित्व अखेड राहते. पंचायतीचे एक मुद्रा असते आणि ती सर्व सामान्य असते. पंचायत स्थावर जंगम मिळकत संपादन करु शकते व धारणाही करु शकते. पंचायत आपल्या नावाने कोणाशीही करारदार करु शकते. अशी मिळकत पंचायत ज्या ठिकाणी असेल त्या गावी असो किंवा गावाच्या सीमे-बाहेर असो. पंचायतीच्या नावाने दावे करता येतात आणि तिच्या विरुध्दही दावा करता येतो. पंचायत एक व्यक्तीभूत संस्था असते आणि ती तिच्या नावाने ओळखली जाते.

पंचायतीतील निवडून आलेले सभासद एक व्यक्ती म्हणून काम करीत असते आणि कायद्याने तिला तसे मानले आहे. पंचायतीची परंपरा अखंड असते. नियमाप्रमाणे शिक्का दोन सभासदांसमोर केला पाहिजे. आणि ज्यांच्या समोर हा शिक्का उठविला त्यांनी आपल्या स्वाक्षऱ्या केल्या पाहिजेत. परंतु हा कायदा तंतोतंत पाळला जाईल असे नाही. तथापि पंचायतीला शिक्का उठवणे अत्यंत आवश्यक आहे. पंचायती विरुध्द दावा करता येतो. परंतु तो करण्यापूर्वी ३ महिन्याची नोटीस दिली पाहिजे नाहीतर दावा फेटाळला जातो. एवढी दीर्घ मुदत देण्याचे कारण म्हणजे पंचायतीने नोटीस करणाऱ्याचा प्रश्न आपसात मिटविण्याचा प्रयत्न करावा किंवा दावा झालाच तर त्यात बचावाची तयारी करावी.

पंचायतीची रचना राज्य सरकार आदेश देईल त्याप्रमाणे केलेली

असते. पंचायतीत जिल्हाधिकारी निश्चित करीत असे. ७ पेक्षा कमी सभासद नसतील आणि १५ पेक्षा जास्त नसतील आणि पंचायत कायद्या-प्रमाणे ते निवडले जातील.

गावात कृषि संबंधित धंदा करणारा किंवा कर्ज देणारा सहयोगी सदस्य म्हणून असेल. ही सहकारी संस्थेची अट असते. असा सहयोगी सदस्य संस्थेचा सभापती असतो. संस्थेच्या कारभारासाठी नेमलेली प्रशासक असतो. असे एकाहून अधिक प्रशासक किंवा एखादी समिती अगर महामंडळ नियुक्त करण्यात येते. जिल्हाधिकारी किंवा त्यांनी अधिकृत केलेला अधिकारी प्रशासक समिती किंवा महामंडळ यांचे प्रतिनिधीत्व करणारी व्यक्ती यांचा समावेश असेल. जिल्हाधिकारी ठरवून देतील त्याप्रमाणे गांव प्रभागात विभागले जाईल आणि प्रत्येक, प्रभागातून पंचायतीच्या सदस्यांची संख्या जिल्हाधिकारी ठरवतील त्याप्रमाणे निश्चित केली जाईल. प्रत्येक पंचायतीतील दोन जागा स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या असतात. गावातील अनुसूचित जातीची आणि जमातीची लोकसंख्या विचारात घेऊन जागा राखून ठेवण्यात येते. या जमातीसाठी राखीव जागा ठेवणे आवश्यक असते.आणि जिल्हाधिका-यांकडून त्या जागा राखून ठेवण्यात येतील त्यांची संख्या निश्चित करण्यात येईल. कालावधी संपला म्हणजे जागा राखीव करण्याची पध्दत बंद होईल. ती पध्दत बंद झाली. परंतु त्यावेळी कोणती व्यक्ती पद धारणा करीत असेल त्या मुदतीच्या बाकी राहिलेली ती व्यक्ती पंचायत सदस्य म्हणून काम करील.

कोणत्याही कारणामुळे पदग्रहण करण्यास उत्सुक असलेल्या आवश्यक संख्येइतक्या योग्य व्यक्ती निवडून आल्या नाही. स्थायी समिती लवकरात

लवकर निवड पात्र व्यक्तीमधून आवश्यक ती संख्या पूरी करण्यासाठी आवश्यक तेवढया व्यक्ती नियुक्त करील आणि त्या व्यक्ती वैधतेने निवडून आल्या असे समजले जाईल. सदस्यांची नावे किंवा नियुक्त केलेल्या सदस्यांची नांव जिल्हाअधिकारी ययोचितरित्या प्रसिध्द करतील. परंतु निवडावयाच्या सदस्याच्या एकूण संख्यांच्या २/३ इतके किंवा त्यापेक्षा अधिक सदस्य निवडण्यात येतील. इतर बाकी सभासद निवडून देण्यात आले नाही. म्हणून पंचायतीच्या रचनेला बाध येणार नाही. २/३ संख्या कदाचित अपूर्णांकात येईल. अर्धा किंवा अध्यापेक्षा जास्त बाकी असली तर काहीच धरु नये.

पंचायतीच्या क्षेत्राची संख्या किंवा तिची लोकसंख्या एक हजारापेक्षा कमी असेल ७ सभासद, एक हजारापेक्षा जास्त व दोन हजारापेक्षा कमी असेल ९ सभासद, दोन हजारापेक्षा जास्त पण ३ हजारापेक्षा कमी असेल तर ११ सभासद, ३ हजारापेक्षा जास्त परंतु ४ हजारापेक्षा कमी असेल तर १५ सभासद.

राखीव जागा स्त्रीया अनूसूचित जाती जमाती यांच्यासाठी आहेत. समाजातला हा पददलित वर्ग आहे आणि त्याला पंचायतीत आपले म्हणणे किंवा मत मांडण्याचा अधिकार असावा. समाज प्रबोधनाच्या दृष्टीने आणि ग्रामविकासाच्या दृष्टीने हे फार प्रशंसनीय पाऊल आहे. या वैरम्य मानण्याचे कारण नाही आणि त्याविरुध्द उठाव करण्यात येऊ नये. आपण सर्व एक आहोत या दृष्टीने आपण एक विचाराने वागले पाहिजे आणि सामाजिक उच्चनिचतेच्या कल्पना बाजूस सारल्या पाहिजेत.

पंचायतीच्या सभासदांची निवडणूक जिल्हाधिकारी नेमतील त्या तारखेला घेण्यात येईल आणि निवडणूकीचे काम कायदाकानून प्रमाणे चालेल.

लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० याच्या उपनिबंधाप्रमाणे मतदारांची यादी तयार करण्यात येते. एखाद्या प्रभागात किंवा वॉर्डमध्ये गावात मतदार, मतदार संघाचा जो भाग समाविष्ट केला असेल त्याच्यासाठी राज्य सरकार आदेश देऊन तो भाग अदिसूचीत करील. अशा तारखेला आमलात असलेले महाराष्ट्र विधान सभेच्या मतदारांची यादी ही या प्रभागाच्या किंवा गांवच्या मतदारांची यादी समजली जाईल. जिल्हाधिकाऱ्यांनी नेमलेला अधिकारी अशा प्रभागासाठी अगर गावासाठी मतदारांची एक यादी ठेवील. अधिसूचीत करणे म्हणजे जाहीरनामा प्रसिध्द करून ठेवणे. मतदार म्हणून पात्र असूनही मतदाराचे नाव क्वचित यादीत येते नाही. तेव्हा इलेक्ट्रोलट रजिस्ट्रेशन अधिकाऱ्याकडे संबंधित व्यक्तीने अर्ज करावा. तो अधिकारी चौकशी करून खात्री पटल्यावर त्या इसमाचे नाव यादीत प्रसिध्द करील.

उमेदवाराची अपात्रता :

निवडणूक आयुक्तांनी पुढील बाबींवर उमेदवाराची अपात्रता स्पष्ट केली आहे.

अस्पृश्यता अपराध कायदा १९५५ किंवा मुंबई दारूबंदी कायदा १९४९ अगर यांसारख्या कायद्यात अपराधी असेल मात्र त्यास दोष ठरविले गेले असेल तर त्यास निवडणूक लढविता येत नाही. सक्षम न्यायालयाने विकल मनाचा ठरविलेला व्यक्ती, न्यायालयाने नादार ठरविलेला व्यक्ती,

गैरवर्तन, लज्जास्पद वर्तनामुळे शासनाच्या नोकरीत असलेल्या इसमास कामावरून बडतर्फ केलेली व्यक्ती त्यानंतर ५ वर्षाच्या कालावधीपर्यंत अपात्र मानल्या जातात.

सरपंच अगर उपसरपंच असतांना गैरवर्तन अगर लज्जास्पद वर्तणूकीमुळे काढून टाकलेला त्या दिवसापासून ५ वर्षे, पंचायतीत पगारी नोकरधारक असेपर्यंत, पंचायतीचा कर किंवा फी बीलाप्रमाणे तीन महिन्यात भरली नसेल, शासनाचा स्थानिक कर्मचारी, पोलीस पाटील पंचायत सदस्य होऊ शकत नाही.

पंचायतीच्या जाहिराती ज्या वर्तमानपत्रातून येतात त्या पत्राशी संबंधित असलेला अशा व्यक्ती अपात्र ठरविलेल्या आहेत. तसेच आय.पी.सी. १५३-वर्गावर्गात वैर वाढविणे २ वर्षे कैद झालेली व्यक्ती, आय.पी.सी. १७१ - लाचलुचपत निवडणूकीवेळी गैरवाजवी दबाव वापरणे. आयपीसी ५०५-बंड पुकारणे दहशत निर्माण करणे या अगर तत्सम अशा गुन्ह्याच्या संबंधीत ज्या व्यक्ती असतात त्यांना निवडणूकीबाबत अपात्र व्यक्ती असे संबोधले जाते.

लोकप्रतिनिधीत्व कायद्यान्वये अपात्र नसलेला निवडणूक आलेला प्रतिनिधी शीलवान, चारित्र्यवान, नि:स्वार्थी, नि:पक्षपातीपणे लोककार्य करणारा सत्शील असावा. त्याचे चरित्र निष्कलंक असले पाहिजे. त्याची निवडणूकीची वैधता न्यायाधीशानी निर्णित करावयाची असते. त्याच्या वैधतेबद्दल आरोप घ्यावयाचा असेल तर निवडणूक निकाल जाहिर झालेल्या तारखेपासून १५ दिवसात ज्या न्यायाधिशाच्या अधिकारक्षेत्रात निवडणूक

असेल त्यांचेकडे अर्ज करावा. सदरहू न्यायाधिश दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ किंवा कनिष्ठ वर्गातला असेल त्यांचा निर्णय निर्णायक असेल.

वार्ड सदस्यांबाबत हरकती असतील त्याबाबत समकक्ष न्यायाधिश योग्य तो अंतिम निर्णय देईल. अवैध मतांची शहानिशा करतील. दोन समान मतें पडलेल्या उमेदवारांना समारोपासमोर बोलावून चिठ्ठया टाकून एक चिठ्ठी उचलून ज्या उमेदवाराचे नांव असेल त्यास पडलेल्या मतात एक मत ज्यादा पडले व तो निवडून आला असे न्यायाधिश जाहीर करतील. यांस पुढे मात्र आव्हान करता येणार नाही.

अशापध्दतीने निवडून आलेले व ज्यांना समकक्ष न्यायाधिशांनी पात्र ठरविलेले अशा उमेदवारांना ग्रामपंचायतीचा सदस्य या नात्याने तेथे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य म्हणून काम करतायेते.

ग्रामपंचायतीच्या ज्या सभा घेतल्या जातात त्याबाबत कांही नियम तयार केले आहेत ते पुढीलप्रमाणे थोडक्यात स्पष्ट केले आहेत. याबाबत ग्रामपंचायत कायद्यानुसार ग्रामपंचायतीच्या सभा कशा चालवाव्यात यासंबंधी राज्यसरकारने केलेल्या नियमांचे परिशिष्ट थोडक्यात पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

या नियमांना मुबई ग्रामपंचायत सभानियम १९५९ म्हणावे. सदस्य या संज्ञेचा अर्थ ग्रामपंचायत सदस्य असा घ्यावा. सरपंच अगर तो गैरहजर असेल तर उपसरपंच यांनी महिन्यांतून किमान एक तरी ग्रामपंचायत सभा घ्यावी. यासाठी कलम २८, ३३ अगर ३४ अन्वये चिटणीसानी तीन दिवस

अगोदर सभेचे विषय, दिनांक, वेळ याच्यासह नोटीस काढून त्यावर प्रत्येक सदस्यांच्या सह्या घेणे अत्यंत आवश्यक आहे. खास सभा सरपंच अगर त्याच्या अनुपस्थित उपसरपंच बोलावू शकतो. त्यास निम्म्याहून अधिक सदस्यांची उपस्थिती अत्यावश्यक आहे. या खास सभेची नोटीस किमान एक दिवस अगोदर नोटीस सदस्यांना मिळाली पाहिजे. त्याच-बरोबर उपरोक्त नोटीसीची प्रतदेखील ग्रामपंचायतीच्या सूचनाफलकावर लावली गेली पाहिजे. ती पंचायत ऑफिसमध्येत झाली पाहिजे.

सरपंच उपस्थित नसेल तर उपसरपंच प्रत्येक सभेचा अध्यक्ष असेल ठेमलेल्या वेळापासून १५ मिनिटात दोघेही नसतील तर उपस्थित सदस्यातून एकास अध्यक्षस्थान द्यावे. जर मध्येच सरपंच उपसरपंच आल्यास त्यांना पु:नश्च अध्यक्षस्थान दिले पाहिजे. उपस्थिती सदस्य संख्येच्या निम्मी अथवा त्याहून अधिक असली पाहिजे. नसेल तर अर्धा तास वाट पाहून ती सभा घेण्याचा निर्णय अध्यक्षास घेता येतो. एखादा निर्णय घेतांना समसमान मते पडली तर अध्यक्षास एक ज्यादा मत देता येते. सभेच्या अध्यक्षाच्या परवानगीने एखादा कार्यक्रम पत्रिकेत दाखल न झालेला विषयही सभेपुढे आणता येतो. झालेला एखादा ठराव रद्द करावयाचा असेल तर त्यासाठी त्याबाबत नोटीस देवून २/३ सदस्यांच्या उपस्थितीत तेथे बहु-मताने तो ठराव ३ महिन्याच्या मुदतीनंतर करता येईल.

ग्रामपंचायत सभा लोकांसाठी खुल्या असाव्यात त्यात गुप्तता असेल त्यावेळी लोकांना मनाई करावी. त्याठिकाणी सदस्यांव्यतिरिक्त जे लोक सभेत व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करत असतील त्यांना हाकलून

देण्याचा अधिकार सभेच्या अध्यक्षाला असेल. मांडलेले प्रस्ताव प्रश्नोत्तर रूपाने सोडवले जावेत. सभानियम १८ प्रमाणे प्रत्येक प्रस्ताव सभेसमोर वाचून मांडले पाहिजेत. नंतर तो पंचायतीच्या विचारासाठी मतास टाकावा. प्रस्ताव मांडल्यावर त्यास अनुमोदन दिल्यानंतर सदर प्रस्तावात सुधारणा करता येणार नाही. करायची असेल तर इतर सदस्य आणि सभा अध्यक्ष यांच्या संमतीने करता येईल.

सभाअध्यक्षाला सभेत कोणत्याही चर्चेत भाग घेता येणार नाही. विशिष्ट प्रसंगी विवाद्य स्वरूपाच्या प्रश्नावेळी समान मते पडल्यास त्यांना स्वत:चे मत स्पष्ट करता येते. प्रत्येक प्रस्ताव ठराविक कालमर्यादेपुरता मर्यादित ठेवावा. अन्यथा सर्व विषय संपविणे अतिशय अवघड होऊन बसते. प्रत्येक विषयाचे प्रस्ताव त्यावरील चर्चा याबाबत कालमर्यादा सभेच्या अध्यक्षांनी सदस्यांच्या संमतीनेच ठरवावयाची असते. प्रस्ताव सूचना उपसूचना या माध्यमाने चर्चेनंतर मतास टाकावेत. यात प्रथम उपसूचना नंतर सूचना व समग्र प्रस्ताव यांस बहुमताच्या मंजूरीनंतर कार्यवाही करण्यास सुरुवात करता येते.

सभेमध्ये हात वर करून प्रस्तावाच्या बाजूस अगर विरुद्ध मतदान घेता येते अगर सदस्यांनी गुप्त मतदानाची मागणी केली तर त्याठिकाणी गुप्तमतदान पद्धतीने प्रस्तावांस मंजूरी अथवा नामंजूरी ठरवावी लागते. त्यावेळी मतपत्रिकेवर सही कोणतीही खूण सदस्यांस करता येणार नाही. या मतपत्रिका निकाल जाहिर झाल्यापासून किमान एक महिना तरी नष्ट करता येत नाहीत.

अध्यक्षास्थानी असणाऱ्या व्यक्तीने शांतता राखणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अंमलबजावणी करण्याचे सर्व अधिकार त्यास असतील. आवश्यकतेनुसार सदर सभा तहकूब करण्याचा अधिकार सदस्य मागणी अगर त्याला अनुचित वाटत असेल अशावेळी सभा अध्यक्षास आहे. जर एखादा सदस्य वेळोवेळी सभेत अडचणी निर्माण करीत असेल तर त्यांवर उपस्थित सदस्यांच्या ३/४ सदस्यांच्या मताधिक्याने त्या सदस्यांस सदरहू कामानिमित्त तात्पुरते काढून टाकता येते. त्यास सभेतून बाहेर जाण्यास भाग पाडता येते. काढून टाकता येते.

एखाद्या सदस्यांस कांहीही कारणाने सभेतून जावयाचे असल्यास त्यांनी सभेच्या अध्यक्षांची पूर्वपरवानगी घेतली पाहिजे. सदस्याला आपला कांही प्रस्ताव मांडावयाचा असेल तर सदर प्रस्ताव सभेपूर्वी पांच दिवस अगोदर दिला पाहिजे. विषयपत्रिकेशिवाय एखादा विषय मांडावयाचा असेल तर तो अध्यक्षांच्या परवानगीनेच मांडता येवू शकेल. आलेल्या प्रस्तावास सुधारणा, त्याची मांडणी सभा अध्यक्ष यांना करण्याचा अधिकार आहे.

कोणताही प्रस्ताव योग्यरीतीने मांडण्यात आल्याशिवाय व त्यांस अनुमोदन देण्यात आल्याखेरीज आणि तो योग्यरीतीने मांडण्यात व त्यास अनुमोदन देण्यात येईपर्यंत त्यावर चर्चा करता किंवा तो टिपणवहीत नोंदविता येत नाही. परंतु अध्यक्षास्थानी असलेल्या व्यक्तीने मांडलेल्या प्रस्तावास अनुमोदन मिळण्याची आवश्यकता असणार नाही.

पंचायतीच्या प्रत्येक सभेचे कामकाज बांधणी केलेल्या पुस्तकात लिहून

ठेवले पाहिजेत. या पुस्तकात प्रत्येक सभेत हजर असणाऱ्या सदस्यांची नांवे, त्या सभेतील निकाल आणि निकालाच्या बाजूने किंवा त्याविरुद्ध मतदान करणाऱ्या सदस्यांची आणि तटस्थ असणाऱ्या सदस्यांची नांवे नमूद केली पाहिजेत. कार्यवाहिच्या टिपणावर सरपंचाने, उपसरपंचाने किंवा सभेत अध्यक्षस्थानी असलेल्या इतर व्यक्तींने आणि हजर असलेल्या सदस्यांनी सही केली पाहिजे. कार्यवाहीच्या टिप्पणीची एक प्रत, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांस सादर केली पाहिजे. पंचायतीच्या कोणत्याही सदस्यास सर्व वाजवी वेळी उक्त कामकाजाची तपासणी करता येईल. अशा पध्दतीने ग्रामपंचायतींनी आपल्या सभांचे कामकाज केल्यास ते उत्तमरीतीने, विनातक्रार आणि सुव्यवस्थित स्वरुपाचे होईल.

......

## प्रकरण तिसरे

## संदर्भ

१) मुंबई ग्रामपंचायत कायदा - १९५८
कायदा नं. ३ - १९५९ - महाराष्ट्र शासन.

२) मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम - १९५९
महाराष्ट्र शासन.

३) सभाशास्त्र अर्थात सभांचा कायदा व कार्यपध्दती -
न्यायदीप प्रकाशन, पान नं. ७३ ते ८१,
कै. शंकरराव जोशी - चौथी आवृत्ती.

४) भारतीय दंडसंहिता - दैनिक संचार - भारत सरकार.

........